वादीने दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश ३९ नियम १, २ अन्वये प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचे विरूध्द दाखल केला आहे.

**वादीचे अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की**,

२. मौजे मानुर, ता. शिरूर कासार, जि. बीड येथील खालील जमीनी या वादग्रस्त मिळकती आहेत,

| अ.क्र. | गट नंबर | वादग्रस्त क्षेत्र हे.आर. |
|---|---|---|
| १. | २४३ | ०१.२६ |
| २. | ५५० | ००.००.२५ |
| ३. | ५५६ | ००.८१ |

मौजे बडेवाडी, ता. शिरुर कासार, जि. बीड येथील खालील जमीनी या वादग्रस्त मिळकती आहेत,

| अ.क्र. | गट नंबर | वादग्रस्त क्षेत्र हे.आर. |
|---|---|---|
| १. | ३३७ | ००.२८ |
| २. | ३४६ | ००.२३ |
| ३. | ४१५ | ००.१५ |
| ४. | ४२४ | ००.५५ |

वरील मिळकती या वादग्रस्त मिळकती असून यापुढे सदर मिळकतीस वादग्रस्त मिळकती असे संबोधले आहे.

३. वादींचे असे कथन आहे की, वादी क्र.१ व २ ह्या आपसात सख्ख्या बहिणी असुन प्रतिवादी क्र.२ व ३ हे त्यांचे सख्खे भाऊ आहेत. तसेच वादी क्र.१ व २ आणि

प्रतिवादी क्र.२ व ३ हे आपसात सख्खे बहिण भाऊ असुन ते प्रतिवादी क्र.१ व मयत उत्तम यांचे अपत्ये आहेत. प्रतिवादी क्र.१ ही मयत उत्तम यांची पत्नी आहे. याशिवाय वादी व प्रतिवादी यांना दुसरे कोणीही कायदेशीर वारस नाही. वादग्रस्त मिळकती ह्या उत्तम खंडु ढवळे यांच्या नावे होत्या. परंतु, प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी आपसात संगणमत करुन वादीच्या परस्पर वादग्रस्त मिळकतींचे या न्यायालयात रे.दि.दा.क्र.७९९/२०१५ अन्वये बबन विरुध्द विलास व इतर असा वाटपाचा दावा दाखल करुन त्यामध्ये आपसात दिनांक तडजोड करुन डिक्री केला व त्याआधारे महसुली अभिलेखातील रेकॉर्डला नोंदवुन फेरफार फेरफार मंजुर करुन घेतला.

४. वादींचे पुढे असे कथन आहे की, वादग्रस्त मिळकती या वादी व प्रतिवादी यांच्या वडीलोपार्जित, हिंदू एकत्र कुटूंबाच्या मिळकती असून त्यांचे अद्याप सरस–निरस मानाने वाटप झालेले नाही. परंतु, प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी संगनमत करुन वाटपाचा दावा दाखल करुन स्वत:चे नावाच्या नोंदी महसुली अभिलेखात लावुन घेतल्या आहेत. तसेच प्रतिवादी क्र.१ ते ३ हे जाणीवपुर्वक वादींना त्यांचे कायदेशीर हक्कापासुन वंचित ठेवण्या करिता वादग्रस्त मिळकती विक्री करण्याच्या प्रयत्नात आहेत. त्यामुळे दिनांक ०५/०२/२०२४ रोजी वादींनी प्रतिवादींना वादग्रस्त मिळकतीचे वाटप करून देणेची विनंती केली असता प्रतिवादींनी स्पष्ट नकार दिला व वादग्रस्त मिळकती विक्री करण्याची धमकी दिली. करीता, वादींनी प्रस्तुतचा दावा वाटपाकरीता दाखल केला असून वादीस प्रस्तुतचा अर्ज दाखल करणे भाग पडले आहे.

४. वादींचे पुढे असे कथन आहे की, वादग्रस्त मिळकतीत त्यांचा अविभाजीत हिस्सा आहे. त्यांना प्रथमदर्शनी केस असून न्यायाचा समतोल त्यांच्या बाजूने आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादींनी वादग्रस्त मिळकतीत त्रयस्त इसमांचा हक्क निर्माण केल्यास वादींना त्यांचे वादग्रस्त मिळकती मधील हक्कापासून वंचित राहावे लागणार आहे. त्यामुळे प्रतिवादी विरूध्द मनाई आदेश दिला नाही तर वादींचे न भरून येणारे नुकसान होईल. म्हणून वादींनी प्रतिवादी क्र. १ ते ३ विरुध्द दाव्याचा अंतिम निकाल लागेपावेतो वादग्रस्त मिळकतींची विक्री, हस्तांतरण, तारण, गहाण, दान करु नये असा तात्पुरता मनाई आदेश मिळावा अशी

विनंती केली.

५. प्रतिवादी क्र.१ ते ३ हे प्रस्तुत प्रकरणात हजर राहिले. परंतु, त्यांनी वेळेत प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल केले नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचे म्हणणेविना चालविण्यात आला.

६. वरीलप्रमाणे वादींचा अर्ज व अभिलेखावर दाखल कागदपत्रे पाहता तसेच वादी यांचे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकता खालील मुद्दे माझे विचाराधीन आहेत. त्यावरील निष्कर्ष व त्यांची कारणमिमांसा खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादी सकृतदर्शनी केस त्यांचे बाजूने असल्याचे शाबीत करतात काय? | होय. |
| २ | तुर्तातुर्त ताकिद न दिल्यास वादींचे अपरिमित नुकसान होईल काय? | होय. |
| ३ | न्यायाचा तोल त्यांच्या बाजूने असल्याचे वादी शाबीत करतात काय? | होय. |
| ४ | काय आदेश? | अर्ज मंजूर. |

:: **कारणमिमांसा** ::

७. वादींनी अर्जाच्या पुष्ठयर्थ अभिलेखावर दावा मिळकतीचे ७/१२ उतारे, गाव नमुना ८अ चे उतारे, नि.दि.दावा क्र.७९९/२०१५ मधील हुकुमनाम्याची सत्यप्रत दाखल केले आहेत.

**मुद्दा क्रमांक १ ते ३** –

८. मुद्दा क्र.१ ते ३ चे अनुषंगे प्रस्तुतचा ताकीदीचा अर्ज निकाली करते समयी वादींनी त्यांची प्रथमदर्शनी केस शाबीत केली आहे काय हे पाहणे गरजेचे आहे. त्या अनुषंगे अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादींच्या मते वादग्रस्त मिळकती या वडीलोपार्जित मिळकती असून त्यांचे अद्याप वाटप झालेले नाही. असे असताना

प्रतिवादी हे वादग्रस्त मिळकतीस तिच्या हक्कापासुन वंचित ठेवण्याच्या हेतुने वादग्रस्त मिळकतीचे खोटे बेकायदेशीर वाटप केले आहे. उलटपक्षी, प्रतिवादींनी न्यायालयात हजर राहून सदरची वादींची कथने नाकारलेली नाहीत. त्यामुळे वादींनी शपथेवर केलेली कथने आहे तशी स्वीकारणे क्रमप्राप्त ठरते.

९. एकंदरीत मुद्या क्र.१ ते ३ च्या अनुषंगे अभिलेखावर उपलब्ध पुरावा व त्यावरील कागदपत्रे विशेषतः वादग्रस्त मिळकतीचे ७/१२ उतारे व गाव नमुना ८अ चे उतारे यावरून दावा मिळकती या वादी व प्रतिवादी यांच्या वडीलोपार्जित मिळकती असून त्यामध्ये वादींचा अविभाज्य हिस्सा असल्याचे दिसुन येते. प्रस्तुत प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी दावा मिळकतीचे वादींचे परस्पर आपसात वाटप केले आहे. अशा परिस्थितीत जर प्रतिवादी विरूध्द तात्पुरता मनाई आदेश दिला नाही तर प्रतिवादी हे वादग्रस्त मिळकतींची पुन्हा विक्री करण्याची शक्यता नाकारता येत नाही. जर प्रतिवादींनी वादग्रस्त मिळकतींचे पुन्हा हस्तांतरण केले तर दाव्यामध्ये गुंतागुंत निर्माण होवून दाव्याची अनेकता होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. सदरची बाब टाळण्याकरीता प्रतिवादी यांचे विरूध्द मनाई आदेश पारीत करणे गरजेचे आहे. परिणामी वादींनी त्यांना प्रथमदर्शनी केस असल्याचे व न्यायाचा समतोल त्यांच्या बाजूने असल्याचे प्रथमदर्शनी सिध्द केले आहे. जर प्रतिवादी विरूध्द मनाई आदेश दिला नाही तर वादींचे वादग्रस्त मिळकतीवरील हक्कास गदा निर्माण होवून वादींचे नुकसान होणार आहे. याउलट, मनाई आदेश दिल्यास प्रतिवादींचे वादग्रस्त मिळकती मधील हक्कावर कोणताही विपरीत परिणाम होणार नाही. परिणामी प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. करीता, मी मुद्दा क्र. १ ते ३ उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. ४ बाबत</u> –**

१०. मुद्दा क्र. १ ते ३ बाबत वर नमूद चर्चेवरुन वादीने वादग्रस्त मिळकती संदर्भात तुर्तातुर्त ताकिदीसाठी लागणाऱ्या बाबी म्हणजेच प्रथमदर्शनी केस, न्यायाचा तोल व अपरिमित नुकसान प्रथमदर्शनी त्यांचे बाजूने असल्याचे शाबीत केले आहे. परिणामी, वादींचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. सबब, मुद्दा क्र. ४ करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. वादींचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी प्रस्तुत दाव्याचा अंतिम निकाल लागेपावेतो वादग्रस्त मिळकतींचे कोणत्याही प्रकारे हस्तांतरण, विक्री, गहाण, दान, तारण, कर्जबोजा निर्माण करुन त्रयस्त ईसमांचा हक्क निर्माण करु नये असा तुर्तातुर्त मनाई हुकूमाचा आदेश प्रतिवादी यांच्या विरुध्द देण्यात येतो.

३. अर्जाचा खर्च दाव्याच्या अंतिम निकालावर अवलंबून राहिल.

AKSHAY SAMBHAJI JAGTAP
Digitally signed by AKSHAY SAMBHAJI JAGTAP
Date: 2025.02.03 17:45:09 +0530

(**अ.सं. जगताप**)

दिनांक ०३/०२/२०२५ दिवाणी न्यायाधीश क. स्तर, शिरूरकासार.

"I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Judgment/order".

Sd/-
[Sagar S. Ajabe]
Stenographer Grade-3

| | | |
|---|---|---|
| Dictated on | : | 03/02/2025 |
| Transcribed on | : | 03/02/2025 |
| Checked & signed on | : | 03/02/2025 |